ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वार्षिक वर्गणी : ६ रु.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार तारीख १५ मे, १९६३ | अंक १०

## विविध माहिती

**सक्तीची बचत रद्द करा**—अखिल भारतीय हिंद मजदूर सभेचें ११ वें वार्षिक अधिवेशन दालमिआनगर येथें भरविण्यांत आलें होतें. कमी उत्पन्नाच्या गटांतील लोकांवरील कराचा भार हलका करण्यासाठी सक्तीच्या बचतीची योजना रद्द करण्यांत यावी, प्राप्तीवरील कराच्या पद्धतींत बदल करण्यांत यावा, रॉकेल व इतर जीवनावश्यक वस्तूंवरील कर रद्द करण्यांत यावेत, अशी मागणी अधिवेशनांत करण्यांत आली.

**अधिक मदत हवी**—आंध्रमधील नागार्जुनसागर नियामक मंडळाच्या बैठकींत धरणासाठी मध्यवर्ती सरकारकडून आणखी मदत घेण्यांत यावी अशी मागणी करण्यांत आली आहे. धरणाच्या कामासाठी राज्य सरकारनें आपल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत जी तरतूद केली आहे त्याशिवाय आणखी ४ कोटी रुपये मध्यवर्ती सरकारनें चालू आर्थिक वर्षांत मंजूर करावे असें मंडळाचें म्हणणें आहे.

**उद्योगपतींची तक्रार**—सुप्रसिद्ध उद्योगपति श्री. जी. डी. बिर्ला सध्यां अमेरिकेचा दौरा करीत आहेत. दौऱ्यांत घेतलेल्या वृत्तपत्र परिषदेंत ते म्हणाले कीं, भारतांत गुंतविल्या जाणाऱ्या अमेरिकन भांडवलाचें प्रमाण फार थोडें आहे. भारतांत गुंतविण्यांत आलेल्या एकूण परदेशी भांडवलापैकी अवघे १५ टक्के भांडवल अमेरिकन आहे. त्या मानानें ब्रिटननें गुंतविलेल्या भांडवलाचें प्रमाण बरेच अधिक म्हणजे ५० टक्के आहे.

**कम्युनिझमबद्दल भ्रमनिरास**—अमेरिकेंतील सुप्रसिद्ध नीग्रो गायक पॉल रॉबसन हा आतां पुन्हां अमेरिकेला परत आला आहे गेलीं तीस वर्षें तो आंतरराष्ट्रीय कम्युनिझमचा एक प्रभावी प्रचारक म्हणून गाजला होता. वार्धक्यानें आणि दारिद्र्यानें पीडित होऊन कम्युनिझमबद्दल त्याचा भ्रम लयास गेला आहे असें म्हणतात. अलीकडे तो लंडन शहरीं राहत असे.

**मोटार-सायकलींचा कारखाना**—मध्यवर्ती सरकारनें एसकॉर्टस लि. ह्या कंपनीला मोटार-सायकली व स्कूटर्स तयार करण्याचा कारखाना काढण्यास परवाना दिला आहे. हा कारखाना फरीदाबाद येथें काढण्यांत येणार असून त्याच्या उभारणीसाठी पोलंडचें सहकार्य घेण्यांत आलें आहे. कारखान्यांत दरसाल ६,००० गाड्या तयार करण्यांत येतील.

**विमानदलासाठीं सुटे भाग**—भारतीय विमानदलाला लागणाऱ्या सुट्या भागांचा पुरवठा करण्यासाठी ब्रिटननें मोठा कार्यक्रम आंखला आहे. ह्या योजनेप्रमाणें सुटे भाग पुरविण्याचें काम चालूहि झालें आहे. ब्रिटनच्या तांत्रिक व कारभारविषयक अधिकाऱ्यांशीं चर्चा करून कार्यक्रमाला विशेष प्राधान्य देण्यांत आलें होतें.

**यौगिक व्यायामाचा प्रचार**—यौगिक व्यायामपद्धतीचें शिक्षण घेतलेले ५२ प्रचारक भारत सेवक समाजानें तयार केले आहेत. ह्या पद्धतीच्या व्यायामानें आरोग्य कसें राखतां येतें तें सप्रयोग दाखविण्याचा त्यांचा हेतु आहे. भारतामधील ३० मोठमोठ्या शहरांतील कामगार वर्गांत योगासनांचीं प्रात्यक्षिकें हे प्रचारक करून दाखविणार आहेत.

**गोव्यांतील छोटे खाणमालक**—गोव्यांतील लोखंडाच्या छोट्या खाणींचे मालक अडचणींत सांपडले आहेत. त्यांच्या मालाला गिऱ्हाईक नसल्यामुळें बहुतेक छोट्या खाणी गेल्या वर्षापासून बंद करण्यांत आल्या आहेत. लोखंडाच्या खनिजाची निर्यात करणारे बडे खाणमालक छोट्या खाणीपासून माल विकत घेत नाहींत. ह्या परिस्थितीमुळे सुमारें २०,००० खाणकामगार बेकार झाले आहेत.

**दक्षिण भारतांत तेलशुद्धीचा कारखाना**—दक्षिण भारतांत सार्वजनिक मालकीच्या विभागांत तेलशुद्धीचा कारखाना उभारण्यासंबंधीं भारत सरकार आणि अमेरिकेंतील फिलिप्स पेट्रोलिअम कंपनी ह्यांच्या दरम्यान एक करार करण्यांत आला आहे. कारखाना उभारण्याचें काम ३० महिन्यांत पुरें करावयाचें कंपनीनें मान्य केलें आहे. त्यासंबंधींचे नकाशे व अहवाल चालू वर्षअखेर सादर करण्यांत येतील.

**गुन्हेगाराच्या शोधासाठी**—टोकिओ शहरांतील ध्वनिमुद्रिका तयार करणाऱ्या एका कंपनीनें एका गुन्हेगाराच्या आवाजाच्या २० हजार ध्वनिमुद्रिका पोलीस खात्याला दिल्या आहेत. ह्या गुन्हेगारानें कांहीं दिवसांपूर्वी ५ वर्षे वयाच्या एका मुलाला पैशाच्या आशेनें पळवून नेलें आहे. पोलिसांनीं ह्या ध्वनिमुद्रिका नाट्यगृहें, दुकानें, खाणावळी, शाळा, भाड्याच्या मोटारींच्या कंपन्या, ह्यांच्याकडे पाठविल्या आहेत.

**पावरोटी कामगारांचा संप**—फिलॅडेल्फिआ शहरांतील पाव बनविणाऱ्या एका कारखान्यांतील कामगारांनीं संप केल्यामुळें कारखानदाराचें फार नुकसान झालें. संपावर जातांना कामगारांनीं पाव भाजण्याच्या भट्ट्या बंद केल्या नाहींत. त्यामुळें हजारों पाव करपून निकामी झाले. कारखान्यानें कामगार संघाकडे २० हजार डॉलर्सची नुकसान भरपाई मागितली आहे.

**अल्युमिनियमच्या खनिजाचा पुरवठा**—म्हैसूर राज्यांत १०० कोटी रुपये खर्चून अल्युमिनम तयार करण्याचा कारखाना उभारण्याचें घाटत आहे. ह्या कारखान्यासाठीं लागणारी बॉक्साइटची माती पुरविण्यासाठी महाराष्ट्र व म्हैसूर राज्यांत करार करण्यांत येण्याचा संभव आहे. कारखाना सार्वजनिक मालकीच्या विभागांत निघण्याची शक्यता आहे.

ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधान: " इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ पुणें, बुधवार तारीख १५ मे, १९६३ अंक १०

## विविध माहिती

**सक्तीची बचत रद्द करा**—अखिल भारतीय हिंद मजदूर सभेचें ११ वें वार्षिक अधिवेशन दालमिआनगर येथें भरविण्यांत आलें होतें. कमी उत्पन्नाच्या गटांतील लोकांवरील कराचा भार हलका करण्यासाठी सक्तीच्या बचतीची योजना रद्द करण्यांत यावी, प्राप्तीवरील कराच्या पद्धतींत बदल करण्यांत यावा, रॉकेल व इतर जीवनावश्यक वस्तूंवरील कर रद्द करण्यांत यावेत, अशी मागणी अधिवेशनांत करण्यांत आली.

**अधिक मदत हवी**—आंध्रमधील नागार्जुनसागर नियामक मंडळाच्या बैठकींत धरणासाठी मध्यवर्ती सरकारकडून आणखी मदत घेण्यांत यावी अशी मागणी करण्यांत आली आहे. धरणाच्या कामासाठी राज्य सरकारनें आपल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत जी तरतूद केली आहे त्याशिवाय आणखी ४ कोटी रुपये मध्यवर्ती सरकारनें चालू आर्थिक वर्षांत मंजूर करावे असें मंडळाचें म्हणणें आहे.

**उद्योगपतींची तक्रार**—सुप्रसिद्ध उद्योगपति श्री. जी. डी. बिर्ला सध्यां अमेरिकेचा दौरा करीत आहेत. दौऱ्यांत घेतलेल्या वृत्तपत्र परिषदेंत ते म्हणाले कीं, भारतांत गुंतविल्या जाणाऱ्या अमेरिकन भांडवलाचें प्रमाण फार थोडें आहे. भारतांत गुंतविण्यांत आलेल्या एकूण परदेशी भांडवलापैकी अवघे १५ टक्के भांडवल अमेरिकन आहे. त्या मानानें ब्रिटननें गुंतविलेल्या भांडवलाचें प्रमाण बरेंच अधिक म्हणजे ५० टक्के आहे.

**कम्युनिझमबद्दल भ्रमनिरास**—अमेरिकेंतील सुप्रसिद्ध नीग्रो गायक पॉल रॉबसन हा आतां पुन्हां अमेरिकेला परत आला आहे गेलीं तीस वर्षें तो आंतरराष्ट्रीय कम्युनिझमचा एक प्रभावी प्रचारक म्हणून गाजला होता. वार्धक्यानें आणि दारिद्र्यानें पीडित होऊन कम्युनिझमबद्दल त्याचा भ्रम लयास गेला आहे असें म्हणतात. अलीकडे तो लंडन शहरीं राहत असे.

**मोटार-सायकलींचा कारखाना**—मध्यवर्ती सरकारनें एसकॉर्टस लि. ह्या कंपनीला मोटार-सायकली व स्कूटर्स तयार करण्याचा कारखाना काढण्यास परवाना दिला आहे. हा कारखाना फरीदाबाद येथें काढण्यांत येणार असून त्याच्या उभारणीसाठी पोलंडचें सहकार्य घेण्यांत आलें आहे. कारखान्यांत दरसाल ६,००० गाड्या तयार करण्यांत येतील.

**विमानदलासाठीं सुटे भाग**—भारतीय विमानदलाला लागणाऱ्या सुट्या भागांचा पुरवठा करण्यासाठी ब्रिटननें मोठा कार्यक्रम आंखला आहे. ह्या योजनेप्रमाणें सुटे भाग पुरविण्याचें काम चालूहि झालें आहे. ब्रिटनच्या तांत्रिक व कारभारविषयक अधिकाऱ्यांशीं चर्चा करून कार्यक्रमाला विशेष प्राधान्य देण्यांत आलें होतें.

**यौगिक व्यायामाचा प्रचार**—यौगिक व्यायामपद्धतीचें शिक्षण घेतलेले ५२ प्रचारक भारत सेवक समाजानें तयार केले आहेत. ह्या पद्धतीच्या व्यायामानें आरोग्य कसें राखतां येतें तें सप्रयोग दाखविण्याचा त्यांचा हेतु आहे. भारतामधील ३० मोठमोठ्या शहरांतील कामगार वर्गांत योगासनांचीं प्रात्यक्षिकें हे प्रचारक करून दाखविणार आहेत.

**गोव्यांतील छोटे खाणमालक**—गोव्यांतील लोखंडाच्या छोट्या खाणींचे मालक अडचणींत सांपडले आहेत. त्यांच्या मालाला गिऱ्हाईक नसल्यामुळें बहुतेक छोट्या खाणी गेल्या वर्षापासून बंद करण्यांत आल्या आहेत. लोखंडाच्या खनिजाची निर्यात करणारे बडे खाणमालक छोट्या खाणीपासून माल विकत घेत नाहींत. ह्या परिस्थितीमुळे सुमारें २०,००० खाणकामगार बेकार झाले आहेत.

**दक्षिण भारतांत तेलशुद्धीचा कारखाना**—दक्षिण भारतांत सार्वजनिक मालकीच्या विभागांत तेलशुद्धीचा कारखाना उभारण्यासंबंधीं भारत सरकार आणि अमेरिकेंतील फिलिप्स पेट्रोलिअम कंपनी ह्यांच्या दरम्यान एक करार करण्यांत आला आहे. कारखाना उभारण्याचें काम ३० महिन्यांत पुरें करावयाचें कंपनीनें मान्य केलें आहे. त्यासंबंधींचे नकाशे व अहवाल चालू वर्षअखेर सादर करण्यांत येतील.

**गुन्हेगाराच्या शोधासाठी**—टोकिओ शहरांतील ध्वनिमुद्रिका तयार करणाऱ्या एका कंपनीनें एका गुन्हेगाराच्या आवाजाच्या २० हजार ध्वनिमुद्रिका पोलीस खात्याला दिल्या आहेत. ह्या गुन्हेगारानें कांहीं दिवसांपूर्वी ५ वर्षे वयाच्या एका मुलाला पैशाच्या आशेनें पळवून नेलें आहे. पोलिसांनीं ह्या ध्वनिमुद्रिका नाट्यगृहें, दुकानें, खाणावळी, शाळा, भाड्याच्या मोटारींच्या कंपन्या, ह्यांच्याकडे पाठविल्या आहेत.

**पावरोटी कामगारांचा संप**—फिलॅडेल्फिआ शहरांतील पाव बनविणाऱ्या एका कारखान्यांतील कामगारांनीं संप केल्यामुळें कारखानदाराचें फार नुकसान झालें. संपावर जातांना कामगारांनीं पाव भाजण्याच्या भट्ट्या बंद केल्या नाहींत. त्यामुळें हजारों पाव करपून निकामी झाले. कारखान्यानें कामगार संघाकडे २० हजार डॉलर्सची नुकसान भरपाई मागितली आहे.

**अल्युमिनियमच्या खनिजाचा पुरवठा**—म्हैसूर राज्यांत १०० कोटी रुपये खर्चून अल्युमिनम तयार करण्याचा कारखाना उभारण्याचें घाटत आहे. ह्या कारखान्यासाठी लागणारी बॉक्साइटची माती पुरविण्यासाठी महाराष्ट्र व म्हैसूर राज्यांत करार करण्यांत येण्याचा संभव आहे. कारखाना सार्वजनिक मालकीच्या विभागांत निघण्याची शक्यता आहे.

# दि सरदार

# कारबोनिक गॅस कंपनी लि.

उत्पादक

**कारबोनिक ॲसिड गॅस**

**सुका बर्फ, सोडा वॉटर मशिनरी**

आणि

**खनिज पाण्याच्या आवश्यकतेसंबंधीं विक्रेते**

रजिस्टर्ड हेड ऑफिस आणि एजन्टस्चें ऑफिस

सर विठलदास चेंबर्स, १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

फॅक्टरी ऑफिस : कॅनॉट रोड, माझगांव, मुंबई. टे. नं. ४०८१२

शाखा आणि फॅक्टरी

१ केडल रोड, दादर, फ्रिझाइट फॅक्टरी टे. ६११२९
२ काम्पटी फॅक्टरी एरिया, रेल्वे स्टेशनच्या दक्षिणेस, काम्पटी ( कँट ) टे. ८
३ दिल्ली–रामबाग रोड, बंगेश पूल टे. २२४७०१
४ कलकत्ता–१०३ ए फोरशोर रोड, शिवपूर, हावरा. टे. ६७–२२४७
५ विजयवाडा–गुणदला, कृष्णाजी स्ट्रीट, आंध्र प्रदेश टे. २०४१
६ रावळपिंडी–डलहाऊसी रोड.

सर्व शाखांसाठी आणि फॅक्टऱ्यांसाठी टेलिग्राफिक पत्ता : ' कारबोनिक '



# दि कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि.

## मु. गौतमनगर, पोस्ट-कोळपेवाडी, तालुका-कोपरगांव, जिल्हा-अहमदनगर.

रजिस्ट्रेशन नं. जी २६० ] टेलिफोन–६३ कोपरगांव. ग्राफ–कोसाका, कोपरगांव.

महाराष्ट्रांतील सहकारी चळवळीची यशस्वी रीत्या कार्यसिद्धी करून दाखविणारा व १९६२–६३ च्या हंगामांत २,३४,००० पोतीं पांढरी शुभ्र दाणेदार साखर व कच्ची साखर उत्पादन करणारा अग्रेसर असा हा साखर-कारखाना सर्वांस परिचित आहे. विशेषतः मुंबईकरांना "कुलपीसागर" म्हणून जास्त परिचित आहे.

| | |
|---|---|
| १. अधिकृत शेअर भांडवल ... ... | रु. ६०,००,००० |
| २. खपलेलें व मागणी केलेलें शेअर भांडवल | रु. ४९,१२,५०० |
| ३. जमा झालेलें शेअर भांडवल ... ... | रु. ४९,८१,७०० |
| ४. जमा झालेली ठेव ... ... | रु. २८,४६,१०० |

—: संचालक मंडळ :—

१. कॅप्टन बी. सी. गरुड, चेअरमन. २. श्री. आर्. एस्. देवकर, व्हाईस चेअरमन. ३. मे. जॉईंट रजिस्ट्रार, को. सो. पुणें. ४. मे. एक्झिक्युटिव्ह इंजिनीअर, नाशिक. ५. बॅ. टी. एस्. पाटील, इंडस्ट्रिअल फायनॉन्स कॉर्पोरेशनचे नॉमिनी. ६. मे. डिस्ट्रिक्ट डेप्युटी रजिस्ट्रार, को. सो. अहमदनगर. ७. श्री. एम्. के. फिरोदिया, बी. ए., एम. पी अहमदनगर, डि. सें. को–ऑप. बँकेचे नॉमिनी. ८. श्री. के. बी. रोहमारे, एम. एल. ए., ९. श्री. एस्. जी. कोल्हे, बी. एससी. ॲग्रि. १०. श्री. एस्. डी. काळे, बी. एससी., सिव्हिल ११. श्री. के. पी. औताडे. १२. श्री. टी. एस्. कुलकर्णी. १३ श्री. बी. एस. गवली, १४. श्री. एम्. एस. तिडके. १५. श्री. ए. बी. होन. १६. श्री. एस्. के. महाले. १७ श्री. बी. डी. गावंड. १८. श्री. एस्. एच्. झगडे.

# अर्थ

बुधवार, ता. १५ मे, १९६३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कामकारविषयक कायद्यांच्या पालनांत कुचराई

आधुनिक राज्यसंस्थांनीं औद्योगिक व्यवस्थेला वळण लावण्यासाठीं अनेक कामगारविषयक कायदे केलेले असतात. हे कायदे पाळण्याची जबाबदारी खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांवर जशी आहे तशीच ती सरकारी मालकीच्या उद्योगधंद्यांवरहि आहे. किंबहुना सार्वजनिक मालकीच्या क्षेत्रांतील उद्योगधंद्यांच्या चालकांवर ती अधिकच पडते. भारताच्या सार्वजनिक मालकीच्या तीन पोलाद कारखान्यांपैकीं रूरकेला येथील पोलादाच्या कारखान्यांतील कामगारविषयक कायद्यांच्या अंमलबजावणीचा अहवाल संबंधित अधिकाऱ्यानें तयार केला आहे. त्यावरून असें दिसून येतें कीं ह्या कारखान्यांत कामगार कायद्यांच्या पालनाबाबत कुचराई करण्यांत येते. अहवालांत अशा प्रकारच्या कुचराईच्या ४६ प्रकारांची नोंद करण्यांत आलेली आहे. ह्यापैकीं कांहीं प्रकार असे आहेत कीं ते जर खाजगी मालकीच्या कारखान्यांत घडले असते तर संबंधित कारखाने बंदच करावे लागले असते. ह्या कायदेभंगाबद्दल कारखान्याच्या चालकांकडे खुलासा मागण्यांत आला असता जें स्पष्टीकरण करण्यांत आलें त्यावरून चालकांना कायद्यांची माहितीच नव्हती असें दिसून आलें. औद्योगिक कारखान्यांत काम करतांना कामगारांच्या जिवाला धोका पोंचूं नये म्हणून अनेक प्रकारची संरक्षण व्यवस्था करावी लागते. ही संरक्षणव्यवस्था करण्यासाठीं रूरकेला पोलाद-कारखान्याच्या चालकांना मुद्दाम बजावण्यांत आलें असतांनाहि त्यांनीं त्याची दखल घेतली नाहीं.

## निकामी जनावरांना आश्रय देणारी संस्था

जीवनकलह जसजसा तीव्र होत चालला आहे तसतसे माणसांच्या आर्थिक मूल्यांनाच प्राधान्य देण्यांत येऊं लागलें आहे. मिळवता माणूस सेवानिवृत्त झाला म्हणजे त्याचें कुटुंबांतील स्थानहि घसरतें असें पुष्कळदा दिसून येतें. निकामी झालेल्या माणसांची ही अवस्था, तर निकामी जनावरांच्या स्थितीबद्दल बोलायलाच नको. अशा निकामी जनावरांना आश्रय देणारी, त्यांचें दुखणेंबाणें बघणारी, म्हातारपणीं त्यांना पोसणारी एक मुलुखावेगळी संस्था मिसेस डोरोथी डीन ह्या बाईंनीं उटकमंडजवळ गेलीं ९ वर्षें चालविली आहे. निलगिरी प्राणिहित संरक्षक संस्था हें तिचें नांव. ह्या संस्थेची स्थापना १९५४ सालीं झाली. परंतु त्यापूर्वी कित्येक वर्षें डीनबाई दीनदुबळ्या, अपंग, रोगी अशा जनावरांची काळजी वाहात होत्या. जनावरांच्या ह्या आश्रयस्थानाचा विस्तार ५१ निसर्गरम्य एकरांवर पसरलेला आहे. हें एक मोठें कुरणच आहे. जखमी, आजारी, म्हातारी, नको असलेलीं अशीं जनावरें दिवसां ह्या कुरणांत चारापाणी खातातपितात; रात्रीं त्यांना बंदिस्त जागेंत नेण्यांत येतें. मोठे घोडे, शिंगरें, गाढवें, गुरेंढोरें, मांजरें, कुत्रीं, इत्यादि अनेक प्रकारचीं जनावरें ह्या आश्रयस्थानांत सुखानें नांदत असतात. त्यांना जरूर लागल्यास वैद्यकीय उपचारहि करण्यांत येतात. सध्यां ह्या आश्रयस्थानांत १३९ जनावरें आहेत. इंग्लंडची राणी एलिझाबेथकडून मिसेस डीन ह्यांना चांगली देणगीहि मिळाली आहे. ही संस्था दरसाल ७,५०० खेडुतांना रोजगारहि पुरविते.

## बिआस नदीयोजनेसाठीं आणखी कर्ज

बिआस नदीवरील विद्युत्-निर्मिती व पाणीपुरवठ्याच्या योजनेसाठीं जागतिक बँकेनें आणखी ६० लाख डॉलर्स खर्च करण्याची परवानगी भारत सरकारला दिली आहे. ह्या जादा कर्जाचा उपयोग योजनेसाठीं लागणारी यंत्रसामग्री व इतर साधनें आयात करण्यासाठीं होणार आहे. नवीन मंजूर झालेलें हें कर्ज जमेस धरतां ह्या योजनेसाठीं जागतिक बँकेनें आतांपर्यंत एकूण ९५ लाख डॉलर्सचें कर्ज दिलेलें आहे. सिंधू नदीच्या पाण्याबद्दल १९६० सालीं जो करार करण्यांत आला त्याला अनुसरून जागतिक बँक आणि अमेरिकेचें आंतरराष्ट्रीय विकास मंडळ ह्या दोन संघटनांनीं बिआस योजनेसाठीं ५·६ कोटी डॉलर्स कर्ज देण्याचें कबूल केलें होतें. आंतरराष्ट्रीय विकास-संघटनेचे प्रतिनिधी नुकतेच भारतांत आले होते. त्यांनीं भारत सरकारच्या संबंधित खात्यांशीं योजनेंतील पुऱ्या झालेल्या कामाची चर्चा केली. योजनेसाठीं द्यावयाचें उरलेलें कर्ज देण्यापूर्वी प्रतिनिधींनीं मुद्दाम कामाची पाहाणी केलेली आहे. बिआस नदीयोजना ही विद्युत् निर्मिति व पाणी पुरवठ्याची अशी संयुक्त योजना असून विद्युत्-योजनेपुरती ती भाक्रा धरणयोजनेशीं जोडण्यांत आलेली आहे. योजनेमुळें सतलज व बिआस नद्यांच्या काळ्यांतील पाणी-पुरवठ्यावर चांगलें नियंत्रण ठेवतां येणार आहे. पंजाबच्या दक्षिणेला व नैऋत्य दिशेला असलेल्या ६ लाख एकर जमिनीला योजनेमुळें पाणीपुरवठा होऊन दरसाल १० कोटी रुपयांचीं पिकें काढतां येतील.

## बंगालमधील अन्नधान्याची बिकट परिस्थिति

पश्चिम बंगालमधील अन्नधान्याची परिस्थिति बिघडल्याच्या वार्ता येत आहेत. मध्यवर्ती सरकारच्या अन्न व शेतकी खात्यांबरोबर राज्याचे मुख्यमंत्री श्री. सेन ह्यांनीं ह्यासंबंधीं चर्चा केली. बंगाली लोकांचें मुख्य खाणें तांदूळ आहे. राज्यांतील लोकांसाठीं दरसाल सुमारें ६० लाख टन तांदूळ लागतो. परंतु राज्यांतील उत्पादन मात्र ४३ लाख टनांच्या आसपास आहे. गेल्या दोन वर्षांत बंगालची लोकसंख्या २२ लाखांनीं वाढली आहे. तांदुळाच्या उत्पादनांत मात्र त्या प्रमाणांत वाढ झालेली नाहीं. बंगालमध्यें तांदुळाचा भाव ४० रुपये मणापर्यंत चढला असून त्यामुळें १९४३ च्या भीषण दुष्काळाचें स्मरण लोकांना होत आहे. ह्यासंबंधीं बोलतांना मुख्यमंत्री श्री. सेन म्हणाले कीं, बंगाली लोकांनीं आपल्या आहाराच्या सवयी बदलल्याशिवाय आणि लोकसंख्येच्या वाढीला आळा घातल्याशिवाय अन्नधान्य टंचाईचा प्रश्न सुटणें केवळ अशक्य आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १५ मे, १९६३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कामकारविषयक कायद्यांच्या पालनांत कुचराई

आधुनिक राज्यसंस्थांनीं औद्योगिक व्यवस्थेला वळण लावण्यासाठीं अनेक कामगारविषयक कायदे केलेले असतात. हे कायदे पाळण्याची जबाबदारी खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांवर जशी आहे तशीच ती सरकारी मालकीच्या उद्योगधंद्यांवरहि आहे. किंबहुना सार्वजनिक मालकीच्या क्षेत्रांतील उद्योगधंद्यांच्या चालकांवर ती अधिकच पडते. भारताच्या सार्वजनिक मालकीच्या तीन पोलाद कारखान्यांपैकी रूरकेला येथील पोलादाच्या कारखान्यांतील कामगारविषयक कायद्यांच्या अंमलबजावणीचा अहवाल संबंधित अधिकाऱ्यानें तयार केला आहे. त्यावरून असें दिसून येतें कीं ह्या कारखान्यांत कामगार कायद्यांच्या पालनाबाबत कुचराई करण्यांत येते. अहवालांत अशा प्रकारच्या कुचराईच्या ४६ प्रकारांची नोंद करण्यांत आलेली आहे. ह्यांपैकी कांहीं प्रकार असे आहेत कीं ते जर खाजगी मालकीच्या कारखान्यांत घडले असते तर संबंधित कारखाने बंदच करावे लागले असते. ह्या कायदेभंगाबद्दल कारखान्याच्या चालकांकडे खुलासा मागण्यांत आला असता जें स्पष्टीकरण करण्यांत आलें त्यावरून चालकांना कायद्यांची माहितीच नव्हती असें दिसून आलें. औद्योगिक कारखान्यांत काम करतांना कामगारांच्या जिवाला धोका पोंचूं नये म्हणून अनेक प्रकारची संरक्षण व्यवस्था करावी लागते. ही संरक्षणव्यवस्था करण्यासाठीं रूरकेला पोलाद–कारखान्याच्या चालकांना मुद्दाम बजावण्यांत आलें असतांनाहि त्यांनीं त्याची दखल घेतली नाहीं.

## निकामी जनावरांना आश्रय देणारी संस्था

जीवनकलह जसजसा तीव्र होत चालला आहे तसतसे माणसांच्या आर्थिक मूल्यांनाच प्राधान्य देण्यांत येऊं लागलें आहे. मिळवता माणूस सेवानिवृत्त झाला म्हणजे त्याचें कुटुंबांतील स्थानहि घसरतें असें पुष्कळदा दिसून येतें. निकामी झालेल्या माणसांची ही अवस्था, तर निकामी जनावरांच्या स्थितीबद्दल बोलायलाच नको. अशा निकामी जनावरांना आश्रय देणारी, त्यांचें दुखणेंबाणें बघणारी, म्हातारपणीं त्यांना पोसणारी एक मुलुखावेगळी संस्था मिसेस डोरोथी डीन ह्या बाईनीं उटकमंडजवळ गेलीं ९ वर्षे चालविली आहे. निलगिरी प्राणिहित संरक्षक संस्था हें तिचें नांव. ह्या संस्थेची स्थापना १९५४ सालीं झाली. परंतु, त्यापूर्वी कित्येक वर्षे डीनबाई दीनदुबळ्या, अपंग, रोगी अशा जनावरांची काळजी वाहात होत्या. जनावरांच्या ह्या आश्रयस्थानाचा विस्तार ५१ निसर्गरम्य एकरांवर पसरलेला आहे. हें एक मोठें कुरणच आहे. जखमी, आजारी, म्हातारी, नको असलेलीं अशीं जनावरें दिवसा ह्या कुरणांत चारापाणी खातातपितात; रात्रीं त्यांना बंदिस्त जागेंत नेण्यांत येतें. मोठे घोडे, शिंगरें, गाढवें, गुरेंढोरें, मांजरें, कुत्रीं, इत्यादि अनेक प्रकारचीं जनावरें ह्या आश्रयस्थानांत सुखानें नांदत असतात. त्यांना जरूर लागल्यास वैद्यकीय उपचारहि करण्यांत येतात. सध्यां ह्या आश्रयस्थानांत १३९ जनावरें आहेत. इंग्लंडची राणी एलिझाबेथकडून मिसेस डीन ह्यांना चांगली देणगीहि मिळाली आहे. ही संस्था दरसाल ७,५०० खेडुतांना रोजगारहि पुरविते.

## बिआस नदीयोजनेसाठीं आणखी कर्ज

बिआस नदीवरील विद्युत्-निर्मिती व पाणीपुरवठ्याच्या योजनेसाठीं जागतिक बँकेनें आणखी ६० लाख डॉलर्स खर्च करण्याची परवानगी भारत सरकारला दिली आहे. ह्या जादा कर्जाचा उपयोग योजनेसाठीं लागणारी यंत्रसामग्री व इतर साधनें आयात करण्यासाठीं होणार आहे. नवीन मंजूर झालेलें हें कर्ज जमेस धरतां ह्या योजनेसाठीं जागतिक बँकेनें आतांपर्यंत एकूण ९५ लाख डॉलर्सचें कर्ज दिलेलें आहे. सिंधू नदीच्या पाण्याबद्दल १९६० सालीं जो करार करण्यांत आला त्याला अनुसरून जागतिक बँक आणि अमेरिकेचें आंतरराष्ट्रीय विकास मंडळ ह्या दोन संघटनांनीं बिआस योजनेसाठीं ५·६ कोटी डॉलर्स कर्ज देण्याचें कबूल केलें होतें. आंतरराष्ट्रीय विकास-संघटनेचे प्रतिनिधी नुकतेच भारतांत आले होते. त्यांनीं भारत सरकारच्या संबंधित खात्यांशीं योजनेंतील पुऱ्या झालेल्या कामाची चर्चा केली. योजनेसाठीं द्यावयाचें उरलेलें कर्ज देण्यापूर्वी प्रतिनिधींनीं मुद्दाम कामाची पाहाणी केलेली आहे. बिआस नदीयोजना ही विद्युत् निर्मिति व पाणी पुरवठ्याची अशी संयुक्त योजना असून विद्युत्-योजनेपुरती ती भाक्रा धरणयोजनेशीं जोडण्यांत आलेली आहे. योजनेमुळें सतलज व बिआस नद्यांच्या काळ्यांतील पाणी-पुरवठ्यावर चांगलें नियंत्रण ठेवतां येणार आहे. पंजाबच्या दक्षिणेला व नैऋत्य दिशेला असलेल्या ६ लाख एकर जमिनीला योजनेमुळें पाणीपुरवठा होऊन दरसाल १० कोटी रुपयांचीं पिकें काढतां येतील.

## बंगालमधील अन्नधान्याची बिकट परिस्थिति

पश्चिम बंगालमधील अन्नधान्याची परिस्थिति बिघडल्याच्या वार्ता येत आहेत. मध्यवर्ती सरकारच्या अन्न व शेतकी खात्यांबरोबर राज्याचे मुख्यमंत्री श्री. सेन ह्यांनीं ह्यासंबंधीं चर्चा केली. बंगाली लोकांचें मुख्य खाणें तांदूळ आहे. राज्यांतील लोकांसाठीं दरसाल सुमारें ६० लाख टन तांदूळ लागतो. परंतु राज्यांतील उत्पादन मात्र ४३ लाख टनांच्या आसपास आहे. गेल्या दोन वर्षांत बंगालची लोकसंख्या २२ लाखांनीं वाढली आहे. तांदुळाच्या उत्पादनांत मात्र त्या प्रमाणांत वाढ झालेली नाहीं. बंगालमध्यें तांदुळाचा भाव ४० रुपये मणापर्यंत चढला असून त्यामुळें १९४३ च्या भीषण दुष्काळाचें स्मरण लोकांना होत आहे. ह्यासंबंधीं बोलतांना मुख्यमंत्री श्री. सेन म्हणाले कीं, बंगाली लोकांनीं आपल्या आहाराच्या संवयी बदलल्याशिवाय आणि लोकसंख्येच्या वाढीला आळा घातल्याशिवाय अन्नधान्य टंचाईचा प्रश्न सुटणें केवळ अशक्य आहे.

## एअर इंडियाचा प्रचारखर्च

### दरवर्षी सुमारें सव्वा कोटी रुपये

एअर इंडियाचीं विमानें पांच खंडांतील ३१,३७३ मैलांचा प्रवास करून २१ देशांतील २६ शहरांशीं दळणवळण करतात. आंतरराष्ट्रीय विमानवहातुकींत स्पर्धा मोठ्या प्रमाणावर चालते, त्यामुळें जाहिरात आणि प्रचार ह्यांवर खर्चहि खूप करावा लागतो. आंतरराष्ट्रीय वहातूक करणाऱ्या इतर कंपन्या प्रचारावर एअर इंडियापेक्षा जास्त खर्च करतात, परंतु त्यांची उलाढालहि मोठी असल्यामुळें एकूण उत्पन्नाशीं ह्या खर्चाचें प्रमाण कमी पडतें. १९६२–६३ मधील अपेक्षित उत्पन्नाच्या ३·९% इतका खर्च एअर इंडियानें प्रचारावर केला. खर्चाचें हें प्रमाण उतरत चाललें आहे. वृत्तपत्रांतील जाहिराती, प्रदर्शनें, टपालानें पत्रकें पाठविणें, शोभिवंत आरास करणें, पोस्टर्स, भेटीदाखल जिनसा देणें, कॅलेंडर्स, इत्यादींच्या मार्गे प्रचार केला जातो. ह्यांपैकीं कांहीं-वरील खर्च रोखीनें करावा लागतो, तर कांहींवरील खर्चाचे पोटीं इतरांचीं कामें केलीं जातात. उदाहरणार्थ, 'लाईफ वृत्तपत्रां'त एक पान जाहिरात देण्यास १,५०,००० रु. पडतात, तर 'टाइम' च्या एक पान जाहिरातीचा आकार २,१५,००० रु. आहे. पण एअर इंडिया ह्या वृत्तपत्रांची वहातूक करून जाहिरातीचा खर्च कांहीं अंशीं परस्पर भागविते. जाहिरात आणि प्रचार ह्यांवर एअर इंडियाचा भारतांत होणारा खर्च एकूण खर्चाच्या मानानें कमी आहे. १९६२–६३ मध्यें त्याचें एकूण प्रचारखर्चाशीं प्रमाण फक्त ८% पडलें. ३५% खर्च अमेरिकेंत करण्यांत आला. १९५९–६० मध्यें जाहिरात आणि प्रचार ह्यांवर ५४·७६ लक्ष रु. खर्ची पडले. १९६०–६१ मध्यें त्याचा आंकडा १०५·९३ लक्ष रु. झाला. जेट विमानांच्या दळणवळणासाठीं खूप जाहिरात करावी लागली, विशेषतः ॲटलँटिक महासागरावरून जेट सुरू केली त्या वेळीं अमेरिकेंत महाग दरानेंहि जाहिरात करणें आवश्यक झालें. जेटमुळें जास्त उतारूंचा प्रवास शक्य होणार होता, म्हणूनहि त्यांना आकर्षण्यासाठीं प्रसिद्धि आवश्यक होती. १९६२–६३ मध्यें एकूण प्रचारखर्च १३१ लक्ष रु. झाला. १९६३–६४ मध्येंहि तेवढा खर्च करण्याची तरतूद केलेली आहे. उत्पन्न वाढत असल्यामुळें प्रचारखर्चाचें उत्पन्नाशीं पडणारें प्रमाण घटत जाईल, अशी अपेक्षा आहे.

## कंपनी कायद्यांतील दुरुस्ती

### मॅनेजिंग एजन्सी संपुष्टांत येणार

कंपनी कायद्यांत लवकरच दुरुस्ती करण्यांत येणार आहे, त्याअन्वयें मॅनेजिंग एजन्सीचे करार संपुष्टांत आणण्यासाठीं कालमर्यादा घालण्यांत येण्याचा संभव आहे. औद्योगिक विकासाला मॅनेजिंग एजन्सीच्या पद्धतीची आतां आवश्यकता उरली नाहीं, असा विचारप्रवाह आह.

### सत्तर वर्षांवरील डायरेक्टरांची निवृत्ति

सत्तर वर्षांवरील डायरेक्टरांची सक्तीनें निवृत्ति व्हावी, अशीहि दुरुस्ती बहुधा केली जाईल. फक्त मध्यवर्ती सरकारच्या पूर्व संमतीनेंच अपवाद करणें शक्य होईल. सध्यांच्या कायद्याप्रमाणें भागदारांची संमति पुरेशी मानली जाते, पण ती नाममात्रच असते असा अनुभव आहे; म्हणून ही दुरुस्ती आवश्यक झाली आहे.

## न्यू सिटिझनच्या जुन्या अधिकाऱ्याची कोर्टांत दाद लागली

### बँक ऑफ बरोडावर डिक्री

बँकेचे एक अधिकारी श्री. एस. पी. शिंदे यांचा प्रॉ. फंड, जामीन रक्कम, ठेव, अशी एकूण सुमारें चाळीस हजारांची रक्कम देण्याचें बेकायदेशीरपणें नाकारल्याबद्दल बँक ऑफ बरोडा शाखेविरुद्ध सिव्हिल जज्ज सीनि. डि. श्री. चव्हाण यांच्या कोर्टांत निकाल होऊन व्याजासह ही रक्कम श्री. शिंदे यांना देण्याचा हुकूम झाला.

श्री. शिंदे यांची नेमणूक न्यू सिटिझन बँक कोल्हापूर शाखेचे एजंट म्हणून झाली. नंतर कोल्हापूर हेड क्वार्टर्स सदर्न डिव्हिजनचे इनचार्ज डायरेक्टर म्हणून त्यांची नेमणूक व पुढें मॅनेजर म्हणून त्यांना नेमण्यांत आलें. हा खटला चालू असतांनाच या बँकेचे व्यवहार दि बँक ऑफ बरोडाकडे गेल्यामुळें या दाव्यामध्यें दि बँक ऑफ बरोडा या बँकेस पक्षकार करण्यांत आले होते.

बँकेशीं मतभेद झाल्यामुळें ता. १-११-१९५६ रोजीं राजिनामा सादर केला व तो ता. १-९-५८ रोजीं स्वीकारण्यांत आला. या वेळीं श्री. शिंदे यांनीं आपली प्रॉ. फंडाची रक्कम रु. २१,००० ठेवीची रक्कम १० हजार व शेअर्सची रक्कम ५,००० अशी रक्कम नोटीस देऊन मागणी केली. पण ती नाकारण्यांत आल्यामुळें हा दावा त्यांना करणें भाग पडलें होतें.

या बाबतींत बँकेचें म्हणणें असें होतें कीं, श्री. शिंदे यांना कांहीं व्यवहार नुकसानीचे केल्यामुळें बँकेस सुमारें रु. ८०,००० नुकसान झालें. तेव्हां त्यांच्या वरील रकमेंतून या रकमेची भरपाई करणें जरूर आहे. पण या बाबतींत बँकेला कांहींच तपशील देतां आला नाहीं असें कोर्टानें ठरावांत म्हटलें आहे.

## डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशन

डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशनला १९६२ मध्यें प्रत्येक १०० रु. च्या ठेवीवर दरसाल ५ न. पैसे ह्या दरानें हप्त्यांच्या स्वरूपांत ९३·७८ लक्ष रु. चें उत्पन्न झालें. क्लेम देण्यासाठीं ३ लक्ष रु. ची तरतूद करून उरलेली रक्कम डिपॉझिट इन्शुअरन्स फंडाकडे वर्ग करण्यांत आली. बँक बंद पडली, तर तिच्या १,५०० रुपयांखालील ठेवीदारांची संपूर्ण ठेव परत करण्यास कॉर्पोरेशन बांधलेली आहे. त्यांवरील ठेवींची परतफेड ठराविक 'स्लायडिंग स्केल' प्रमाणें केली जाईल. कॉर्पोरेशनकडे २७६ बँकांच्या १८९५ कोटी रुपयांच्या ठेवींचा विमा उतरलेला आहे. त्यांपैकीं १,५०० रुपयांखालील ठेवींची बेरीज ४४८ कोटी रु. होते. कॉर्पोरेशनकडे ७७·०३ लक्ष खात्यांचा विमा उतरलेला आहे; त्यांपैकीं १५·७७ लक्ष खात्यांत २,७०० रुपयांपेक्षा कमी रक्कम आहे. १९६२ मध्यें लिक्विडेशनमध्यें गेलेल्या युनिटी बँकेच्या ठेवीदारांच्या ठेवींच्या रकमेची तरतूद करावी लागली. ती बँक आतां स्टेट बँक ऑफ इंडियांत विलीन करण्यांत आली आहे. युनिटी बँकेच्या ठेवींच्या खात्यांत बराच गोंधळ असल्या-कारणानें ठेवीदारांची पक्की यादी तयार करणें स्टेट बँकेला अद्याप शक्य झालेलें नाहीं. कॉर्पोरेशनला ३·७५ रु. चे क्लेम्स द्यावे लागतील आणि ७५,००० रु. वसूल होतील, अशी अपेक्षा आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## भारताच्या राजधानींतील महागाईचें जीवन

ग्रामीण भागांपेक्षा शहरांतील जीवन अधिक महाग असतें. त्यांतहि कोणत्याहि देशाच्या राजधानींतील जीवन अधिकच महाग असावें ह्यांत आश्चर्य नाहीं पण, नवी दिल्लींतील जीवन इतर कित्येक देशांच्या राजधानींतील जीवनापेक्षा अधिकच महाग असल्याचें शहरांतील संयुक्तराष्ट्र संघटनेच्या नोकरांनीं केलेल्या पहाणीवरून आढळून आलें आहे. महागाईच्या बाबतींत नव्या दिल्लीचा अनुक्रम, कैरो, अंकारा, बॉन, लंडन, कराची व रिओ-डि-जानेरिओ ह्यांच्याहिवर लागतो. चांगले पगार असणाऱ्या संघटनेच्या नोकरांना जर दिल्ली महाग वाटते तर बेताची प्राप्ति असलेल्या दिल्लींतील नागरिकांना महागाई किती जाणवत असेल त्याची कल्पनाच केलेली बरी !

## रशिया फ्रान्सकडून बोटी घेणार

बोटी व त्यांचें सामानसुमान आयात करणाऱ्या रशिअन व्यापारी संघटनेनें फ्रान्समधील बोटी बांधणाऱ्या एका कारखान्याकडे तीन मोठ्या मच्छीमारी बोटींची मागणी नोंदविली आहे. ह्या बोटी म्हणजे मासे पकडण्यापासून ते डबाबंद करीपर्यंतचें सर्व काम करणारे तरते कारखानेच असतील. बोटींसाठी रशियाला २ कोटी डॉलर्स मोजावे लागतील आणि त्या तयार करण्यासाठी कारखान्याला ३० लाख तास काम करावें लागेल. सर्व प्रकारचे मासे साफसूफ करून हवाबंद डब्यांत भरण्याची अद्ययावत् यंत्रसामग्री बोटींत बसविण्यांत येणार आहे.

## विम्याच्या हप्त्यांच्या स्वरूपांत बचत बेताचीच

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. पी. सी. भट्टाचार्य फेडरेशन ऑफ इन्शुअरन्स इन्स्टिट्यूटस् ह्या संघटनेच्या वार्षिक परिषदेंत भाषण करतांना म्हणाले कीं, भारतांत व्यक्तीच्या जवळील वरकड उत्पन्नापैकी फारच थोडें उत्पन्न आयुर्विम्याच्या हप्त्यांच्या स्वरूपांत बचत केलें जातें. इतर प्रगत देशांत आयुर्विम्याच्या हप्त्याच्या रूपानें करण्यांत येणाऱ्या बचतीचें प्रमाण पुष्कळच अधिक आहे. तथापि गेल्या कांहीं वर्षांत हें प्रमाण वाढत चाललेलें आहे. आयुर्विम्याचा प्रसार अजून ग्रामीण विभागांत फारसा झालेला नाहीं हें त्याचें कारण आहे. आयुर्विम्याच्या धंद्याचा पुढील विकास ग्रामीण भागांतील त्याच्या वाढीवर अवलंबून आहे.

## रशिआंत स्थायिक झालेला हिंदी शास्त्रज्ञ

डॉ. ए. सीतारामय्या हे हिंदी शास्त्रज्ञ रशिआंत स्थायिक झालेले असून, त्यांना १९३६ सालीं रशिअन नागरिकत्वाचे अधिकारहि देण्यांत आलेले आहेत. मॉस्कोमधील एका प्रयोगशाळेंत ते गेलीं तीस-बत्तीस वर्षे संशोधन करीत असतात. उच्च शिक्षण घेण्यासाठी ते १९२१ सालीं प्रथम अमेरिकेंत गेले व तेथून १९३० सालीं रशिअन सरकारच्या बोलावण्यावरून मॉस्कोला गेले. सध्यां त्यांचें वय ६४ वर्षांचें आहे. ते नुकतेंच हैदराबादला येऊन गेले. कृष्णा जिल्ह्यांतील वायूर गांवचे ते मूळचे रहिवासी. रशिआंत शास्त्रें व उद्योगधंदे ह्या बाबतींत वेगानें प्रगति होत आहे असें त्यांनीं सांगितलें.

## अमेरिकेंतील भारतीय विद्यार्थी

अमेरिकेंत परदेशांतील ६२,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत; त्यांपैकी १,००० विद्यार्थी भारतीय आहेत.

## सहकारी संस्थेमार्फतच विक्री करावी

म्हैसूर राज्याच्या मजूरमंत्र्यांनीं एका सहकारविषयक परिसंवादांत उद्घाटनाचें भाषण करतांना अशी सूचना केली आहे कीं, ज्या शेतकऱ्यानें सहकारी सोसायटीकडून कर्ज घेतलें असेल त्याला आपल्या मालाची विक्री त्याच संस्थेमार्फत करण्याची सक्ति करण्यांत यावी. असें केल्यानें सोसायटीकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करून घेणें सोपें होईल. सध्यां अशी परिस्थिति आहे कीं शेतकऱ्याला दिलेलें कर्ज आणि त्याच्या मालाची विक्री ह्यांच्यांत कांहींच दुवा नाहीं. त्यामुळें अर्थातच दिलेल्या कर्जाची वसुली करण्याचें काम अवघड होऊन बसतें.

## पूर्व भारतामधील नव्या कंपन्या

चालू वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यांत पूर्व-भारतांत ८९नव्या लिमिटेड कंपन्या नोंदविण्यांत आल्या. त्या सर्वांत मिळून १३·५५ कोटी रुपये अधिकृत भांडवल गुंतविण्यांत आलें. ह्याच कालावधींत १४ कंपन्यांचा कारभार गुंडाळण्यांत आला आणि ३० कंपन्यांना कंपनी कायद्यांतील तरतुदीप्रमाणें नोंदींतून कमी करण्यांत आलें. सर्वांत अधिक म्हणजे ७४ नव्या कंपन्या पश्चिम बंगाल राज्यांत नोंदविण्यांत आल्या.

## मृत माणसाच्या रक्तानें रुग्णाचें संजीवन

मृत मनुष्याच्या अंगांतील रक्त काढून घेऊन तें रुग्णांच्या अंगांत घालण्याचे प्रयोग यशस्वी झाले आहेत. अचानक मृत्युमुखीं पडलेल्याचें रक्त तत्काळ काढून घेऊन तें रक्ताच्या बँकेंतहि ठेवतां येतें. अर्थात्, मृत देहाची पूर्ण तपासणी करूनच रक्त घेणें सुरक्षित असतें. रक्तदान करणारीं अशीं मृत माणसें थोडींच असतात, ही एक अडचण आहे !

## हिंदी विद्यार्थी सर्वांत उत्तम

मॉस्को येथील फ्रेन्डशिप विद्यापीठाचे प्रा. एर्झिन ह्यांच्या मतानें विद्यापीठांत शिक्षणासाठी आलेल्या परदेशीय विद्यार्थ्यांत हिंदी विद्यार्थी सर्वांत उत्तम आहेत. प्रा. एर्झिन हे विद्यापीठाचे रेक्टर असून विद्यापीठाच्या वैद्यकीय पदवीला इंडिअन मेडिकल असोसिएशनची मान्यता मिळविण्यासाठी ते दिल्लीला आले होते. विद्यापीठांत निरनिराळ्या ८० देशांतील तरुण उच्च शिक्षण घेत आहेत.

**खनिज तेलाचें उत्पादन**—हिंदच्या तेल आणि नैसर्गिक वायुमंडळानें १९६३ च्या जूनपासून खनिज तेलाचें उत्पादन अधिक वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. निर्माण होणारें तेल रोज मुंबईमधील एसो व बर्माशेल तेलशुद्धीच्या कारखान्यांकडे पाठविण्यांत येईल. दररोज सुमारें २,००० टन तेल पाठविलें जाईल असा अंदाज आहे. १९६५ पासून गुजरातमध्यें उभारल्या जाणाऱ्या तेलशुद्धीच्या कारखान्याला रोज ५,५०० टन अशुद्ध तेल पाठविण्याची योजना आंखण्यांत आली आहे.

**मुंबईसाठी कोयनेचें पाणी**—मुंबई शहराला कोयनेच्या धरणांतील पाणी पुरविण्याच्या एका योजनेचा विचार महाराष्ट्र राज्य सरकार करीत आहे. सध्यां हें पाणी पोफळी येथील विद्युत् यंत्रांना गति देऊन अरबी समुद्राला मिळते. पोफळीपासून मुंबई शहर सरळ रेषेंत अवघें १२० मैल आहे. योजना मंजूर झाल्यास इतक्या लांबीचे नळ टाकावे लागतील. संकल्पित योजनेमुळें मुंबईची पाण्याची गरज पूर्णपणें भागेल.

## हत्ती येथील सोन्याच्या खाणीचा ताबा

म्हैसूर राज्यांतील हत्ती येथील सोन्याच्या खाणी ताब्यांत घेण्याचा विचार मध्यवर्ती सरकार करीत होतें; परंतु ह्या खाणी ताब्यांत घेण्याचा मध्यवर्ती सरकारचा हेतु नाहीं असें म्हैसूर राज्य सरकारला आतां कळविण्यांत आलें आहे. ह्या खाणी म्हैसूर सरकारनें सुवर्ण नियंत्रण मंडळाकडे सोन्याच्या प्राथमिक उत्पादक म्हणून नोंदवाव्या आणि नोंद केलेल्या सोन्याच्या व्यापाऱ्यांना बाजारभावाप्रमाणें सोनें विकावें अशा सूचना करण्यांत आल्या आहेत. हत्ती येथील सोन्याच्या खाणींत सुवर्णमिश्रित खनिजाचा सांठा किती आहे ह्यासंबंधीं शंका व्यक्त करण्यांत आल्या होत्या. मध्यवर्ती सरकारनें ह्या खाणी ताब्यांत घेऊन चालवावयाच्या म्हटल्यास खाणींत सरकारला मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवावें लागणार आहे. पण सोन्याच्या सांठ्याविषयींच शंका उत्पन्न झाल्यामुळें सरकार खाणी घेऊनच चालविण्यास उत्सुक नाहीं. हत्ती येथील सोन्याच्या खाणी चालविण्याचा खर्च कोलार येथील खाणींना येणाऱ्या खर्चापेक्षा कमी आहे. तरीपण तो खर्च सरकारला फार वाटतो. हत्ती येथील सोन्याच्या खाणी चालू ठेवण्यासाठी आर्थिक मदत देण्याचेंहि मध्यवर्ती सरकारनें नाकारलें आहे. कारण अशा तऱ्हेनें मदत देणें आंतरराष्ट्रीय नाणें-निधीच्या नियमांच्या विरुद्ध आहे. कोलार येथील सोन्याच्या खाणींना अशी मदत देण्यास नाणेंनिधीतर्फे आक्षेप घेण्यांत आलेला आहे. हत्ती येथील खाणींत उत्पादित होणारें सोनें बाजार-भावानें विकण्यास परवानगी दिल्यामुळें ह्या खाणींच्या खर्चांत बचत करतां येईल व तिचा तोटा कमी होईल अशी अपेक्षा आहे.

## दागिन्यांच्या निर्यातीची योजना

सोन्याचे व चांदीचे दागिने तयार करून ते परदेशीं निर्यात करण्याची एक योजना भारत सरकार तयार करीत असल्याची वार्ता आहे. योजनेचें निश्चित स्वरूप अद्याप ठरलेलें नसलें तरी ती लवकरच तयार करण्यांत येईल. योजना अमलांत आल्यास सोन्याचांदीचें काम करणाऱ्या कामगारांना मोठ्या प्रमाणावर काम मिळण्याची शक्यता आहे. सुवर्ण-नियंत्रण जारी झाल्यावर आपत्तींत सांपडलेल्या अनेक कामगारांची परिस्थिति त्यामुळें सुधारेल. सोन्या चांदीच्या विविध प्रकारच्या अलंकारांना अमे-रिकेंत बरीच मागणी असल्याचें सांगण्यांत येत आहे.

## मुंबईमधील कारखान्याला परवाना

टंगस्टन आणि मोलिब्डेनम् ह्या धातूंच्या तारा तयार कर-ण्याचा कारखाना काढण्याची परवानगी मुंबईमधील एका कंपनीला देण्यांत आली आहे. कंपनीनें हॉलंडमधील एका कार-खान्याचें तांत्रिक सहकार्य मिळविलें आहे. विजेचे दिवे तयार करणाऱ्या कारखान्यांना लागणारा हा माल सध्यां आयात करावा लागतो. हा कारखाना उत्पादन करूं लागल्यावर दरसाल १२ लाख रुपयांचें परदेशीय चलन वांचेल.

## मद्रास राज्यांत शस्त्रास्त्रांचा कारखाना

हिंदी लष्कराला लागणारीं शस्त्रास्त्रें मोठ्या प्रमाणावर निर्माण करण्यासाठी संरक्षणखातें मद्रास राज्यांत एक कारखाना लवकरच काढणार आहे. हा कारखाना तिरुचिरापल्लीजवळ निघणार असून त्यासाठी लागणारी २,००० एकर जमीन मिळविण्याची खटपट मद्रास सरकार करीत आहे. उभारणीचें काम संरक्षणखातें स्वतःच करणार असून त्या कामीं ८ कोटी रुपये खर्च करणार आहे.

## डॉक्टरांनीं भागीदारींत व्यवसाय करावा

अन्नमलाई विद्यापीठाचे उपकुलगुरु डॉ. सी. पी. रामस्वामी अय्यर ह्यांनीं एका प्रसंगीं बोलतांना असें मत व्यक्त केलें आहे कीं वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांनीं भागीदारीच्या तत्त्वावर आपला व्यवसाय करावा. वकिलीच्या धंद्यांत ज्याप्रमाणें व्यक्तिशः स्वतंत्र वकिली करण्याचे दिवस संपले आहेत, त्याचप्रमाणें ते वैद्यकीय व्यवसायांतहि भूतकालांत जमा झाले आहेत. वैद्यकीय व्यवसायांत एकेका विभागाचा खास अभ्यास केलेल्या तज्ज्ञांचें महत्त्व वाढत आहे. म्हणून डॉक्टर लोकांनीं भागीदारींत व्यवसाय करण्यास प्रारंभ केला पाहिजे. लोकांची सेवा कार्यक्षमतेनें व तत्परतेनें करावयाची असल्यास हाच एक मार्ग उपलब्ध आहे.

## डॉक्टरांना काय समजते ?

धूम्रपान करण्याच्या संवयीमुळें निकोटिन नामक विषारी द्रव्य शरीरांत भिनतें व त्यामुळें माणसाच्या आयुष्याची मर्यादा कमी होते, असें डॉक्टर सांगत असतात. पाश्चिमात्य देशांतून धूम्रपाना-विरुद्ध प्रचार करणाऱ्या संस्थाहि आहेत. पण धूम्रपानामुळें आरोग्याला अपाय होतो हें मत ऑस्ट्रेलिआंतील दोन शतायुषी व्यक्तींना मान्य नाहीं. ह्या दोन व्यक्तींपैकी एक स्त्री असून ती आज कित्येक वर्षे धूम्रपान करीत आहे. आजहि ह्या स्त्रीला रोज २० सिगारेटस् लागतात. पण सिगारेटस् महाग असल्यामुळें धूम्र-पानाचें प्रमाण रोज १० वर आणण्याचा तिचा विचार आहे. दुसरी व्यक्ति पुरुष असून तो रोज ६० सिगारेटस् ओढतो. सिगारेटस्मुळेंच आपण दीर्घायुषी झालों असा त्याचा दावा आहे. ह्या बाबतींत डॉक्टर्सना कांहीं समजत नाहीं, असें त्यांचें म्हणणें आहे.

## दुर्गापूर पोलाद कारखान्यासाठी रेल्वे एंजिनें

दुर्गापूर येथील पोलादाच्या कारखान्यांत वाहतुकीच्या कामा-साठी वापरतां यावीं म्हणून हिंदुस्थान स्टील लि. ह्या कंपनीनें एका ब्रिटिश एंजिनिअरिंग कंपनीकडे तेल व विजेवर चालणाऱ्या १५ रेल्वे एंजिनांची मागणी नोंदविली आहे. ह्या एंजिनां-साठी ५ लाख पौंड किंमत द्यावी लागेल. त्यांची जास्तींत जास्त गती ताशीं ३० मैलांची आहे. शिवाय जरूर पडली तर कारखान्याबाहेर मोठ्या प्रवासासाठींहि ती वापरतां येतील.

## चार्टर्ड अकौंटंट्सच्या परीक्षेसाठी परदेशगमन

ग्रेट ब्रिटनमधील इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट्सच्या परीक्षेस बसण्याच्या दृष्टीनें ज्या विद्यार्थ्यांना तेथील चार्टर्ड अकौंटंट्सच्या फर्म्समध्यें आर्टिकलशिप करावयाची आहे, अशांना परदेशी हुंडणावळीचे बाबतींत सवलती देण्याचें ठरलें आहे. आर्टिकलशिपच्या मुदतींत ज्यांना तेथील फर्म्स मोबदला देणार आहेत, अशांच्याच अर्जांचा विचार केला जाईल; ज्यांना आर्टिकलशिपसाठी स्वतः रक्कम भरावी लागणार असेल, अशांचे अर्ज विचारांत घेतले जाणार नाहींत. ३० जून, १९६३ ही अर्ज स्वीकारण्याची अखेरची तारीख आहे.

## मि. युजिन ब्लॅकची नवी नेमणूक

गेल्या जानेवारीपर्यंत जागतिक बँकेचे अध्यक्ष असलेले मि. युजिन ब्लॅक ह्यांची रॉयल डच पेट्रोलियम कंपनीच्या डायरेक्टरचे जागीं नेमणूक झाली आहे.

### हा विवाह अध्यक्षपदाच्या आड येईल काय ?

न्यूयॉर्कचा गव्हर्नर नेल्सन रॉकफेलर ह्याचा मिसेस मार्गारेटा फिटूलर मर्फी हिचेशीं दि. ४ मे रोजीं विवाह झाला. रॉकफेलरचें वय ५४ वर्षांचें असून गेल्याच वर्षी, ३१ वर्षे जिच्याबरोबर त्यानें संसार केला त्या पत्नीचा व त्याचा घटस्फोट झाला होता. ३६ वर्षे वयाची मिसेस मर्फी हिनें १ एप्रिल रोजींच आपल्या पतीशीं काडीमोड केला होता. १९६४ सालीं अमेरिकेच्या अध्यक्षाची निवडणूक होईल, त्यांत रिपब्लिकन पक्षातर्फे रॉकफेलर उभा राहणार आहे, पण त्याच्या विवाहाचा त्याच्या निवडणुकीवर प्रतिकूल परिणाम होईल असे मत व्यक्त केलें जात आहे. अद्याप एकहि घटस्फोटित मनुष्य अमेरिकेचा अध्यक्ष झाला नाहीं. अदलाई स्टीव्हन्सनचा घटस्फोट झाला होता पण त्यानें पुनः विवाह केला नव्हता; तो आयसेनहोअरच्या विरुद्ध १९५२ मध्यें अध्यक्षपदासाठीं उभा राहिला होता, पण निवडून आला नव्हता. कांहीं काळ लोटल्यावर लोकांची नाराजी कमी होईल आणि न्यूयॉर्कच्या 'फर्स्ट लेडी'ला लोकमत आपल्या पतीला अनुकूल करायला संधि मिळेल, असें रॉकफेलरच्या अनुयायांचें मत आहे. रॉकफेलर १९५८ सालीं गव्हर्नरच्या पदासाठी उभा होता. ह्या नूतन मिसेस रॉकफेलरनें निवडणुकीच्या मोहिमेंत स्वयंसेवक म्हणून मदत केली होती. मे, १९६१ अखेर ती त्याच्या कचेरींत पूर्ण वेळ पगारी नोकरी करीत होती. ती स्वत: श्रीमंत असून, पूर्वीच्या एका अध्यक्षाच्या इस्टेटीची वारस आहे.

### भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराची कल्पना देणारें नवें मासिक

'फॉरिन ट्रेड ऑफ इंडिया' हें भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराची कल्पना देणारें, त्याचप्रमाणें भारताच्या विकसनशील अर्थकरणाचें दिग्दर्शन करणारें मासिक केन्द्रीय व्यापार व उद्योगखात्याच्या आंतरराष्ट्रीय व्यापार विभागानें नुकतेंच सुरू केलें आहे. गेल्या पंधरा वर्षांमध्यें या देशांत जें विकासाचें, विशेषत: औद्योगिक विकासाचें एक पर्व सुरू झालें त्या विकासाच्या निरनिराळ्या छटा व देशाची निरनिराळ्या वस्तु निर्यात करण्याची वाढलेली क्षमता, याबाबतची माहिती हें मासिक दर महिन्याला देईल. या मासिकाच्या पहिल्या अंकांत सर्वांत जुन्या कापड धंद्याची माहिती दिली असून श्री. मनुभाई शहा, श्री. आर. जी. सरैय्या आणि श्री. प्रभु व्ही. मुहा यांचे लेख आहेत.

### स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि.

ह्या कंपनीला १९६२ सालीं घसारा काढण्यापूर्वी १४ लक्ष, ६८ हजार रु. नफा झाला; १९६१ सालीं त्याची रक्कम ११ लक्ष, ७३ हजार रु. होती. एकूण विक्री १९६१ चे मानानें ७½ लक्ष रुपयांनीं वाढून ती १०५ लक्ष रुपयांची झाली. करपात्र ६% डिव्हिडंड दिला जाईल. कंपनीला १७·५ लक्ष रुपयांचें नवें भांडवल विक्रीस काढण्याची परवानगी मिळाली आहे. त्यांपैकी ५·५ लक्ष रुपयांचा विनियोग सध्यांच्या प्रेफरन्स भागांची रिडीम करण्याकडे केला जाईल आणि बाकीची रक्कम कंपनीच्या विस्तारास उपयोगी पडेल.

**अमुल गौळवाड्याचें उत्पादन**— आनंद येथील अमुल गौळवाड्यानें आरे येथील गौळवाड्याला करण्यांत येणाऱ्या दुधाच्या पुरवठ्यांत दुपटीनें वाढ करण्याची योजना आंखली आहे. हा गौळवाडा खेडा जिल्हा सहकारी दूध-उत्पादक संघातर्फे चालविला जातो. आरे येथील गौळवाड्याला सध्यां ५० टक्के दूधपुरवठा ह्या संघातर्फे होतो. संघाच्या विस्तारयोजनेला ५० लाख रुपये खर्च येणार आहे.

### माणसाच्या बुद्धीचा फारसा विकास नाहीं

हारवर्ड विद्यापीठांतील तौलनिक प्राणिशास्त्राचे तज्ज्ञ डॉ. नायर ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, माणसाच्या मेंदूच्या आकारांत आणि बुद्धींत आतां फारसा विकास होण्याची शक्यता नाहीं. 'प्राणिसृष्टि आणि विकास' ह्यासंबंधीं तयार केलेल्या एका अहवालांत ते म्हणतात कीं, ह्यापुढें बुद्धीच्या विकासाच्या बाबतींत उलट दिशा लागण्याचाहि संभव आहे. गेल्या ३० हजार वर्षांचा विचार केला तर माणसाच्या बुद्धीचा विकास थबकलेला दिसतो. ज्यांना निसर्गानें बुद्धीची देणगी दिली असेल त्यांना उत्तेजन देण्यासाठीं करविषयक व शिक्षणविषयक कायद्यांत सुधारणा करणें हाच एक उपाय आहे.

### अपघाती मृत्यूंत स्त्रियांची संख्या अधिक


नागपूर कॉर्पोरेशनच्या आरोग्य खात्यानें गोळा केलेल्या माहितीप्रमाणें अपघातानें मृत्युमुखांत पडणाऱ्यांत स्त्रियांची संख्या अधिक आढळून येते. १९५७ ते १९६२ ह्या काळांत नागपूरमध्यें १९५५ अपघाती मृत्यु घडून आले. त्यांपैकी १,१४० स्त्रिया होत्या व ८१५ पुरुष होते. एकूण मृत्यूंपैकी ४६ टक्के मृत्यु भाजल्यानें अगर भाजण्याच्या जखमामुळें झालेले होते. १२ टक्के माणसें बुडून मेलेलीं होतीं. १५ ते १४ वर्षांपर्यंतच्या वयाच्या माणसांत अपघाती मृत्यूंची संख्या अधिक प्रमाणांत आढळून आली. ह्या गटांतील १,०११ मृत्यूंपैकी ६१९ मृत्यु स्त्रियांचे होते.

### बटाटे उकरून काढणारे अवजार

कोइमतूर येथील शेतीच्या अवजारांचें संशोधन करणाऱ्या संस्थेनें निलगिरी जिल्ह्यांतील बटाट्याचें पीक उकरून काढण्यास सोईस्कर यंत्र तयार केलें आहे. हें यांत्रिक अवजार बैलांकडून ओढण्याचें असून त्याचें वजन अवघें ३५ ते ४० पौंड आहे. अवजाराच्या साह्यानें एका दिवसांत १ ते १॥ एकर जमिनींतील बटाटे वर काढतां येतील. त्याची किंमत अवघी २५ रुपये आहे. सध्या बटाटे वर काढण्याचें काम मोठ्या कामगारांच्या साह्यानें मजुरांकडून करविण्यांत येतें. पण ह्या पद्धतींत पुष्कळ बटाटे वायां जातात.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES



Make doubly sure by fitting

GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

### साड्यांच्या निर्यातीनें परदेशीय चलन

भारतामधील उंची साड्या निर्यात करून परदेशीय चलनाची प्राप्ति होऊं लागली आहे. १९६३ च्या मार्चअखेर संपलेल्या आर्थिक वर्षांत भारत अमेरिकेला ३ लाख रुपयांच्या उंची साड्या निर्यात करील असा अंदाज आहे. गेल्या वर्षी अशा प्रकारच्या १,६५,००० रुपये किंमतीच्या साड्या अमेरिकेला निर्यात करण्यांत आल्या. रेशमाच्या उंची बनारसी साड्यांना अमेरिकेंत चांगली मागणी आहे. ह्या साड्यांवरील मोहक जरीचें काम तिकडे लोकप्रिय आहे. अर्थात् ह्या साड्यांपासून जरूर ते कपडे तयार करण्यांत येतात.

### रशिआ–चीन व्यापारी करार

रशिआ व चीन ह्या देशांनीं उभयतांत १९६३ सालापुरता एक व्यापारी करार केला आहे. करारांतील अटींप्रमाणें रशिआ चीनला लोह व लोहेतर धातु, मोटारगाड्या, यंत्रचलित नांगर व त्यांचे सुटे भाग, तेलजन्य वस्तू, लांकूड, रासायनिक माल, यांत्रिक हत्यारें व इतर यांत्रिक साधनें पुरविणार आहे. उलटपक्षीं चीन रशिआला शिसें, लोहमिश्रित धातु, पारा, कच्चें लोखंड, विणलेलीं वस्त्रें, फळें इत्यादि माल पुरविणार आहे. गेल्या दोन-तीन वर्षांत रशिआ व चीन ह्यांच्यांत राजकीय तेढ उत्पन्न झाल्यामुळें परस्परांमधील व्यापार थंडावत चालला होता. भारत व चीन ह्यांच्यामधील उत्तर सीमा तंट्याच्या पार्श्वभूमीवर रशिआ व चीन ह्यांच्यांतील बऱ्या–वाईट संबंधांना एरव्हींपेक्षा अधिक महत्त्व प्राप्त झालेलें आहे.

### ब्रिटनला खादीची निर्यात

खादी व ग्रामोद्योग मंडळानें अलीकडे परदेशांना खादी निर्यात करण्याबद्दल तीन दीर्घ मुदतीचे करार केलेले होते. ह्या करारांप्रमाणें पांच वर्षांच्या अवधींत ब्रिटन व अमेरिका ह्या देशांना सुमारें २ कोटी रुपये किंमतीची खादी निर्यात करण्यात येणार आहे. खादींत सुती व रेशमी खादीचा समावेश आहे. निर्यातीच्या करारानुसार खादीचा पहिला हप्ता 'जलधर्म' ह्या सिंदीया कंपनीच्या मालवाहू बोटींतून ब्रिटनला रवाना करण्यांत आला. खादी बोटीवर चढवितांना मंडळाचे अध्यक्ष श्री. धेबर मुंबई बंदरावर हजर होते. ह्या पहिल्या हप्त्याची किंमत २ लाख रुपये आहे.

### भारतीय नृत्य शिकण्याची हौस

ऑस्ट्रेलिआच्या टेलिव्हिजनच्या पडद्यावरील भारतीय पद्धतीचें नृत्य पाहून ऑस्ट्रेलिआंतील पुष्कळ मुलें हिंदी नृत्य शिकण्याचा आग्रह धरीत आहेत. हे नृत्यप्रकार एका लॅटव्हिअन नर्तिकेनें शिकविलेलीं मुलें करून दाखवितात. सध्यां ती ऑस्ट्रेलियांतील मेलबोर्न शहरांत राहात असली तरी पौर्वात्य व भारतीय नृत्यांत ती चांगली पारंगत आहे. मद्रास व दिल्ली शहरांत राहून तिनें भारतीय नृत्यप्रकार आत्मसात केलेले आहेत. ऑस्ट्रेलिआंतील मुलांना भारताच्या नृत्यप्रकारांतील वेषभूषा फार आवडते असा तिचा अनुभव आहे.

**पश्चिम रेल्वेवरील वाहतूक**—पश्चिम रेल्वेच्या वाहतुकींत गेल्या पांच वर्षांत ३० टक्क्यांनीं वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणें ह्या रेल्वेच्या उपनगरी वाहतुकींत गेल्या ६ वर्षांत ५५ टक्के वाढ झालेली आहे. रेल्वेनें प्रवास करणाऱ्यांकडून अनेक जोराच्या तक्रारी करण्यांत येतात; परंतु सर्व तक्रारींत गाड्यांत होणाऱ्या गर्दीची तक्रार फार केली जाते.


## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेड्यूल्ड बँक

**हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.**

टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ताः–युवरबँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

चालू :–०·५० टक्के. सेव्हिंग्ज् बँक :-३ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष–४¼ टक्के, २ वर्षें–४½ टक्के, ३ वर्षें–४¾ टक्के, ४ वर्षें–५ टक्के, ५ वर्षें–५¼ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युम्युलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

शाखा–विस्तार

शाखा–१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर–मार्केट यार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड. दि. ३१–१२–१९६२

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ९,६०,८२९ |
| गंगाजळी | रु. | ६५०,००० |
| ठेवी | रु. | ३,४३,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ४,००,००,०००हून अधिक |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम., *जनरल मॅनेजर.*

रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. *चेअरमन.*

## कण आणि क्षण

लेखकः—श्री. वा. काळे

**तिसरी आवृत्ति प्रसिद्ध झाली !**


पृ. सं. १६०. किं. रु. ३=५०

व्हीनस प्रकाशन,

३८१ क, शनिवार पुणें २.

*भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक*

## दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.



लाख

वसूल भांडवल ... रु. — ९.५८

राखीव निधी ... रु. — १०.९१

ठेवी ........ रु. —३०५.४९

खेळतें भांडवल . रु. —३३५.००

मुख्य कचेरी सारस्वत बँक गृह, गिरगांव, मुंबई–४

शाखा: फोर्ट, दादर, वरळी, वडाळा, माहिम, पुणें व बेळगांव

महिला शाखा: गिरगांव, मुंबई–४

### साड्यांच्या निर्यातीनें परदेशीय चलन

भारतामधील उंची साड्या निर्यात करून परदेशीय चलनाची प्राप्ति होऊं लागली आहे. १९६३ च्या मार्चअखेर संपलेल्या आर्थिक वर्षांत भारत अमेरिकेला ३ लाख रुपयांच्या उंची साड्या निर्यात करील असा अंदाज आहे. गेल्या वर्षी अशा प्रकारच्या १,६५,००० रुपये किंमतीच्या साड्या अमेरिकेला निर्यात करण्यांत आल्या. रेशमाच्या उंची बनारसी साड्यांना अमेरिकेंत चांगली मागणी आहे. ह्या साड्यांवरील मोहक जरीचें काम तिकडे लोकप्रिय आहे. अर्थात् ह्या साड्यांपासून जरूर ते कपडे तयार करण्यांत येतात.

### रशिआ–चीन व्यापारी करार

रशिआ व चीन ह्या देशांनीं उभयतांत १९६३ सालापुरता एक व्यापारी करार केला आहे. करारांतील अटींप्रमाणें रशिआ चीनला लोह व लोहेतर धातु, मोटारगाड्या, यंत्रचलित नांगर व त्यांचे सुटे भाग, तेलजन्य वस्तू, लांकूड, रासायनिक माल, यांत्रिक हत्यारें व इतर यांत्रिक साधनें पुरविणार आहे. उलटपक्षीं चीन रशिआला शिसें, लोहमिश्रित धातु, पारा, कच्चें लोखंड, विणलेलीं वस्त्रें, फळें इत्यादि माल पुरविणार आहे. गेल्या दोन-तीन वर्षांत रशिआ व चीन ह्यांच्यांत राजकीय तेढ उत्पन्न झाल्यामुळें परस्परांमधील व्यापार थंडावत चालला होता. भारत व चीन ह्यांच्यामधील उत्तर सीमा तंट्याच्या पार्श्वभूमीवर रशिआ व चीन ह्यांच्यांतील बन्या–वाईट संबंधांना एरव्हींपेक्षा अधिक महत्त्व प्राप्त झालेलें आहे.

### ब्रिटनला खादीची निर्यात

खादी व ग्रामोद्योग मंडळानें अलीकडे परदेशांना खादी निर्यात करण्याबद्दल तीन दीर्घ मुदतीचे करार केलेले होते. ह्या करारांप्रमाणें पांच वर्षांच्या अवधींत ब्रिटन व अमेरिका ह्या देशांना सुमारें २ कोटी रुपये किंमतीची खादी निर्यात करण्यात येणार आहे. खादींत सुती व रेशमी खादीचा समावेश आहे. निर्यातीच्या करारानुसार खादीचा पहिला हप्ता 'जलधर्म' ह्या सिंदीया कंपनीच्या मालवाहू बोटींतून ब्रिटनला रवाना करण्यांत आला. खादी बोटींवर चढवितांना मंडळाचे अध्यक्ष श्री. धेबर मुंबई बंदरावर हजर होते. ह्या पहिल्या हप्त्याची किंमत २ लाख रुपये आहे.

### भारतीय नृत्य शिकण्याची हौस

ऑस्ट्रेलिआच्या टेलिव्हिजनच्या पडद्यावरील भारतीय पद्धतीचें नृत्य पाहून ऑस्ट्रेलिआंतील पुष्कळ मुलें हिंदी नृत्य शिकण्याचा आग्रह धरीत आहेत. हे नृत्यप्रकार एका लॅटव्हिअन नर्तिकेनें शिकविलेलीं मुलें करून दाखवितात. सध्यां ती ऑस्ट्रेलिआंतील मेलबोर्न शहरांत राहात असली तरी पौर्वात्य व भारतीय नृत्यांत ती चांगली पारंगत आहे. मद्रास व दिल्ली शहरांत राहून तिनें भारतीय नृत्यप्रकार आत्मसात केलेले आहेत. ऑस्ट्रेलिआंतील मुलांना भारताच्या नृत्यप्रकारांतील वेषभूषा फार आवडते असा तिचा अनुभव आहे.

**पश्चिम रेल्वेवरील वाहतूक**—पश्चिम रेल्वेच्या वाहतुकींत गेल्या पांच वर्षांत ३० टक्क्यांनीं वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणें ह्या रेल्वेच्या उपनगरी वाहतुकींत गेल्या ६ वर्षांत ५५ टक्के वाढ झालेली आहे. रेल्वेनें प्रवास करणाऱ्यांकडून अनेक जोराच्या तक्रारी करण्यांत येतात; परंतु सर्व तक्रारींत गाड्यांत होणाऱ्या गर्दीची तक्रार फार केली जाते.


## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ताः—युवरबँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

चालू :—०·५० टक्के. सेव्हिंग्ज् बँक :- २ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष–४¼ टक्के, २ वर्षें–४½ टक्के, ३ वर्षें–४¾ टक्के,
४ वर्षें–५ टक्के, ५ वर्षें–५¼ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युम्युलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

शाखा–विस्तार

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर–मार्केट यार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड. दि. ३१–१२–१९६२

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ९,६०,८२५ |
| गंगाजळी | रु. | ६५०,००० |
| ठेवी | रु. | ३,४३,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ४,०0,००,०००हून अधिक |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी.ए., बी. कॉम्., *जनरल मॅनेजर.*

रा. ना. गोडबोले, बी.ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. *चेअरमन.*



## कण आणि क्षण

लेखकः—श्री. वा. काळे

**तिसरी आवृत्ति प्रसिद्ध झाली !**

पृ. सं. १६०. किं. रु. ३=५०

व्हीनस प्रकाशन,

३८१ क, शनिवार पुणें २.



*भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक*

## दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

लाख

वसूल भांडवल... रु. — ९.५८
राखीव निधी ... रु. — १०.९१
ठेवी........ रु. —२०५.४९
खेळतें भांडवल . रु. —२३५.००

मुख्य कचेरी
सारस्वत बँक गृह,
गिरगांव, मुंबई–४

शाखा: फोर्ट, दादर, वरळी, वडाळा, माहिम, पुणें व बेळगांव
महिला शाखा: गिरगांव, मुंबई–४

## साखर-कारखान्यांच्या क्षेत्रांतील रस्त्यांची दुर्दशा

### रबरी धांवांच्या गाड्या वापरण्याची सूचना

साखर कारखान्यांच्या भागांत ऊस वाहतुकीच्या गाड्यांना रबरी टायर्स बसवावेत, अशी सूचना उपमंत्री डॉ. रफिक झकेरिया यांनीं रविवार दि. १४ रोजीं नगर येथें जिल्हा परिषद सभागृहांत साखर कारखान्यांचे प्रतिनिधींपुढील भाषणांत केली. सध्यां उसाच्या वाहतुकीसाठीं लोखंडी धांवांचीं चाकें असलेल्या बैलगाड्या वापरल्या जातात. लोखंडी धांवांमुळें रस्त्यांची खराबी फार होते व वारंवार रस्तेदुरुस्तीचा खर्च वाढतो.

### रस्ते कॉंक्रीटचे करा

चर्चेमध्यें कारखान्यांच्या प्रतिनिधींनीं साखर कारखान्यांच्या क्षेत्रांतील रस्त्यांच्या वाईट परिस्थितीसंबंधीं व कांहीं रस्त्यांवर ऊसगाड्यांची वाहतूक चालू ठेवण्याकरतां कारखान्याच्या चालकांनाच दरवर्षी १२ ते १५ लाख रुपये खर्च कसा करावा लागतो यासंबंधीं निवेदन केलें. टायरच्या बैलगाड्या वापरण्याविषयीं नापसंती व्यक्त करून त्यांनीं सांगितलें कीं, कारखान्यांतील उसाच्या वाहतुकीचा भार ज्या रस्त्यांवर जास्त पडतो ते रस्ते प्रथम कॉंक्रीटचे किंवा पक्के खडीचे केल्याशिवाय प्रश्न सुटणार नाहीं. तथापि टायरच्या गाड्या वापरून पाहण्यास त्यांनीं संमति दिली.

साखर कारखान्यांच्या क्षेत्रांत ऊसवाहतुकीसाठीं वापरले जाणारे रस्ते सुधारण्यासाठी १९५८ सालीं सरकारनें ३ कोटी रुपयांचा कार्यक्रम सुरू केला आहे. त्यांतून नगर जिल्ह्यांतील ५७ रस्त्यांसाठी ११६ लाख रुपये खर्च केले जातील. त्यापैकी ८२ लाख रुपये आतांपर्यंत खर्च झाले आहेत. नगर-मनमाड रस्ता ५० मैल कॉंक्रीटचा करण्यांत आला आहे. केवळ त्यासाठींच ६० लाख रुपये खर्च झाले आहेत.

### काय केलें पाहिजे

प्रतिनिधींनीं चर्चेत सांगितलें कीं, टायरच्या बैलगाड्यांना प्रत्येकी १००० रु. जास्त खर्च येईल व त्यांच्या दुरुस्तीसाठी पुरेसे तंत्रज्ञ ग्रामीण भागांत मिळणार नाहींत. या गाड्या शेतांत ऊस तोडणीचें काम चालतें तेथें नेतां येणार नाहींत. रस्तेदुरुस्तीचा कार्यक्रम हातीं घेतांना ज्या रस्त्यांवर वाहतुकीचा जास्त भार आहे त्यांच्या सुधारणेकडे प्रथम लक्ष दिलें जावें. तसें झालें नाहीं, तर कारखान्याजवळच्या अंतर्गत भागांतील रस्त्यांच्या सुधारणेसाठी पैसा खर्च केला जावयास हवा. साखर कारखाने हे मध्यबिंदु कल्पून त्या कारखान्याजवळचे ३–४ मैलांपर्यंतचे रस्ते प्रथम पक्के केले पाहिजेत.

उपमंत्री श्री. झकेरिया यांनीं सांगितलें कीं, सिमेंटची टंचाई फार आहे; म्हणून कॉंक्रीटचे रस्ते करणें तूर्त शक्य नाहीं. हे रस्तेहि २ वर्षांत खराब होतात. म्हणून टायरच्या गाड्यांचा उपयोग करणें इष्ट आहे.

चर्चेमध्यें अशोकनगरचे चेअरमन श्री. भास्कर पाटील, राहुरी कारखान्याचे चेअरमन श्री. बा. बा. तनपुरे, गोदावरी शुगर मिलसचे जनरल मॅनेजर श्री. हुजा, गणेशनगरचे संचालक श्री. चोळके, जिल्हा परिषद अध्यक्ष श्री. शंकरराव काळे व जिल्हा कॉंग्रेसप्रमुख श्री. एकनाथराव निंबाळकर यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला. श्री. शंकरराव काळे यांनीं सरकारला विनंती केली कीं, जिल्हा परिषदेच्या कक्षेंतील या रस्त्यांच्या दुरुस्त्या व देखभालीसाठीं सरकारनें १०० टक्के ( विशिष्ट योजना म्हणून ) अनुदान द्यावें.

—संघशक्ति


**बेळगांव बँक लिमिटेड मध्यें आपल्या बचतींची वाढ होऊं द्या.**

होम सेव्हिंग्ज ठेवींवर ३ ( तीन ) %

५ वर्षांच्या मुदती ठेवींवर ५½ ( साडेपांच ) % पर्यंत

३ वर्षांच्या कॅश सर्टिफिकिटांवर ४½ ( साडेचार ) %

५ वर्षांच्या कॅश सर्टिफिकिटांवर ५ ( पांच ) %

५ वर्षांच्या क्युम्युलेटिव्ह ठेवींवर ५½ ( साडेपांच ) %

आकर्षक अटींवर कॉल आणि शॉर्ट टर्म ठेवी स्वीकारल्या जातात.

**दि बेळगांव बँक लिमिटेड**

स्थापना : १९३० ] [ शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस आणि रजिस्टर्ड ऑफिस

रविवार पेठ, बेळगांव, म्हैसूर राज्य

*म्हैसूर आणि महाराष्ट्र राज्यात एकूण १८ शाखा.*

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

हुबळी आणि मुधोळ ( म्हैसूर राज्य ) येथें लवकरच शाखा उघडण्यांत येतील.



**महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड, मुंबई**

[ दि विदर्भ सहकारी बँक लि. सम्मीलित ]

: मुख्य कचेरी : — ९, बेंक हाऊस लेन, फोर्ट मुंबई. टेलिफोन नं. २५५१७४–७५.

: विभागीय कचेरी : — महाल : नागपूर. तारेचा पत्ता : फार्मर बँक

: बृहन्मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर.

चेअरमन : प्रा. ध. रा. गाडगीळ

ह्या बँकेंत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठीं दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ३ कोटी ९९ लाख |
| गंगाजळी व फंड | ... | १ कोटी ११ लाख |
| ठेवी | ... | ११ कोटी १९ लाख |
| खेळतें भांडवल | ... | ६५ कोटी १८ लाख |

महाराष्ट्र राज्यांत सर्वत्र शाखा व संलग्न बँका आहेत.

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, चिठ्ठे, वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

### सरकारी क्षेत्रांतील चौथा तेलशुद्धि कारखाना

भारत सरकार व अमेरिकेची फिलिप्स पेट्रोलियम कंपनी यांमध्यें, भारतांत एक तेलशुद्धि-कारखाना काढण्याच्या एका करारावर उभय पक्षांच्या प्रतिनिधींनीं २७ एप्रिल रोजीं स्वाक्षऱ्या केल्या. या करारानुसार एक नवीन कंपनी स्थापण्यांत येणार असून, त्यांत ५१ टक्के भांडवल ( रुपयांत ) भारत सरकारचें, २५ टक्के भांडवल ( डॉलरमध्यें ) फिलिप्स पेट्रोलियम कंपनीचें व उरलेलें २४ टक्के भांडवल भारत सरकार ठरवील त्या भारतीय व्यक्तींचें वा कंपन्यांचें असेल. या कारखान्याची शक्ति २५ लाख टन राहणार असून तो कोचीन विभागांतील सोईस्कर अशा जागी उभारण्यांत येईल. ही जागा निश्चित करण्याकरतां एका समितीची स्थापना करण्यांत आली आहे.

### नेपाळमधील कारखान्यांसाठी रशिआची मदत

रशिआच्या मदतीनें नेपाळमध्यें एक साखरेचा व सिगारेटचा कारखाना उभारण्यांत येत आहे. दोन्ही कारखाने सार्वजनिक मालकीचे असतील. साखरेचा कारखाना भारताच्या सरहद्दीनजीक वीरगंज येथें उभारण्यांत येत असून रोज १,००० टन ऊंस गाळण्याची शक्ति असलेली यंत्रसामग्री त्यांत बसविण्यांत येत आहे. साखर आणि सिगारेटस् ह्या दोन वस्तु आयात करण्यासाठी नेपाळला दरसाल बराच पैसा खर्च करावा लागतो. नेपाळमध्यें कांहीं शेतांत भारतीय व रशिअन जातीच्या तंबाखूची लागवड करण्यांत आली असून ती यशस्वीहि झाली आहे. नेपाळमधील लहान सिगारेटच्या कारखान्यांतून सध्यां तयार होणारा माल निकृष्ट दर्जाचा असतो.

### मध्यप्रदेशाची औद्योगिक पाहणी

अखिल भारतीय कारखानदार संघाच्या मध्यप्रदेशाच्या शाखेनें मध्यप्रदेशाची औद्योगिक पाहणी करण्याची योजना आंखली आहे. ह्या पाहणीसाठी २ लाख रुपये खर्च येणार असून तींत अनुभवी तंत्रज्ञ, औद्योगिक कारभारी आणि इंजिनिअर्स भाग घेणार आहेत. त्याशिवाय राज्य सरकारच्या अनुभवी अधिकाऱ्यांची मदतहि मागण्यांत आली आहे. खर्चांतील कांहीं हिस्सा राज्य-सरकारकडे मागण्यांत आला आहे.

### हैड्रोजन बाँबच्या स्फोटापासून शक्ति ?

हैड्रोजन बाँबच्या स्फोटानें उत्पन्न होणाऱ्या शक्तीवर नियंत्रण ठेवून तिचा उपयोग उद्योगधंद्यांसाठी करण्याची कल्पना पाश्चात्त्य व रशिअन शास्त्रज्ञ मनांतून बाळगून आहेत. त्या दृष्टीनें हैड्रोजन बाँबच्या स्फोटामुळें उत्पन्न होणारी उष्णता कारणी लावण्यासाठी दोघांचेहि प्रयत्न चालू आहेत. रशिआंतील अणुशक्ति मंडळाच्या शास्त्रज्ञांनीं ह्या प्रयत्नांत अलीकडे बरेंच यश मिळविल्याची वार्ता आहे. अणुविज्ञानाचा उपयोग शांततेच्या कामासाठी करण्याच्या प्रयत्नांना त्यामुळें जोराची चालना मिळेल आणि औद्योगीकरणासाठी लागणाऱ्या शक्तीचा कायमचा व जवळजवळ अमर्याद सांठा माणसाच्या हातीं लागेल.

### लोखंडाच्या खनिजाची निर्यात

हिंदच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें ह्या वर्षी ६ लाख टन लोखंडाचें खनिज रुमेनिआला पुरविण्याचा करार त्या देशाशीं केला आहे. भारतामधील लोखंडाच्या खनिजाची रुमेनिआला पहिली निर्यात १९५९ सालीं करण्यांत आली. त्या वर्षी प्रथम १८ हजार टन खनिजाची निर्यात करण्यांत आली होती.



सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमचीं वैशिष्ट्यें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्म-शताब्दि दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :–३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केट जवळ, मुंबई २.



वेडेकर
मसाले, लोणचीं व पापड
आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.
वापरून पाहा.
गुगभाट, मुंबई ४.
शाखा : ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.



वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२९००

बचतीच्या आकर्षक योजना

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | " ३। " |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | " ५ " |

*मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिलें व ' दुर्गाधिवास ' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.